ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434, Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख १३ ऑगस्ट, १९५८ | अंक ११

## विविध माहिती

**शिवणाचीं यंत्रें**—दि स्मॉल इंडस्ट्रीज सर्व्हिस असोसिएशन, मद्रास ह्या संस्थेनें केलेल्या पहाणीवरून असें आढळून आलें आहे कीं, दक्षिण भारतांत शिवणाच्या यंत्रांना लागणारे बहुतेक भाग तयार करतां येण्यासारखे आहेत. त्याचप्रमाणें ते जुळवून संपूर्ण यंत्रेंहि तयार करतां येतील. हा धंदा कुटिरोद्योगाच्या पद्धतीवर चालूं शकेल.

**साखरेची परदेशी निर्यात**— परदेशीय चलन मिळविण्याच्या उद्देशानें भारत सरकारनें साखरेची निर्यात करण्याचें ठरविलें आहे. निर्यात इंडिअन शुगर मिल्स असोसिएशनमार्फत करण्यांत येणार आहे. निर्यातीच्या योजनेस अनुसरून दक्षिण अर्काटमधील कारखान्यांत तयार झालेली २०० टन साखर मद्रास बंदरांतून पेनांगला निर्यात करण्यांत आली.

**मध्यप्रदेशाबद्दल अनुबोधपट**— मध्यप्रदेशाची ओळख करून देणारा एक अनुबोधपट भारत-सरकारचें चित्रपटखातें काढणार आहे. चित्रपटांत राज्याच्या सांस्कृतिक अंगाप्रमाणेंच आधुनिक घटनांचेंहि चित्रीकरण करण्यांत येणार आहे. सामूहिक विकास योजनेंतील जपानी भातशेतीचें चित्रण मुद्दाम करण्यांत येणार आहे.

**पाण्याच्या वाढत्या खपानें चिंता**—अमेरिकेंत पाण्याचा खप एकसारखा वाढत असल्यानें खाऱ्या पाण्यापासून गोडें पाणी करण्याची स्वस्त पद्धत शोधून काढणें आवश्यक झालें आहे. असें न झाल्यास, पुढील पिढीला पाण्याचा दुष्काळ पहावा लागेल. १९०० सालीं रोज ४,००० कोटि गॅलन पाणी खपत असे; १९८० सालीं रोज ६,००० कोटि पाणी लागेल.

**ओरिसा सरकारची बचत मोहीम**—ओरिसा सरकारनें आपल्या नोकरींतील कायम न झालेल्या नोकरवर्गापैकी २५ टक्के नोकरांना कमी करण्याचें ठरविलें आहे. त्याचप्रमाणें, खात्यांच्या प्रमुखांनीं आपल्या प्रवासभत्त्यांत ५ टक्के कपात करावी असा हुकूम काढण्यांत आला आहे. राज्यांतील जमीन-महसुलाची २ कोटी रुपये बाकी थकल्यानें सरकारला बचत करावी लागत आहे.

**दिल्ली ते मॉस्को विमानवहातूक**— एअर इंडिया इंटरनॅशनल कंपनी ता. १४ ऑगस्टपासून दिल्ली ते मॉस्को हा नवा विमानमार्ग चालूं करणार आहे. ह्या प्रवासाची रंगीत तालीम नुकतीच यशस्वी रीत्या करण्यांत आली. ह्या प्रवासाला अवघे १२ तास लागतील. वाटेंत फक्त ताश्कंद येथें थांबून विमान थेट मॉस्कोला जाईल.

**चीनला अधिक गव्हाची विक्री**—चालू सालीं कॅनडानें चीनला ५० लाख डॉलर्स किंमतीचा गहूं विकला असून आणखीहि गहूं विकण्याच्या वाटाघाटी उभयतां देशांत चालूं आहेत. कॅनडांत पिकणाऱ्या गव्हाला परदेशी बाजारपेठा मिळवूं देणें जरूरीचें झाल्यानें कनेडिअन सरकारनें आपलें एक मंडळ परदेशांच्या दौऱ्यावर पाठविलें आहे.

**जम्मूमधील ट्यूब वेल्सची योजना**—जम्मूच्या आसपासच्या निर्जल विभागांत नालिका-कूप खोदण्यासाठी काश्मीरच्या सरकारनें ६५ लाख रुपये खर्च केले आहेत. सुमारें ३२ विहिरी खोदण्याचें काम पूर्ण होत आलें आहे. विहिरी खोदण्यांत आल्यामुळें ह्या भागांतील तीन लाख लोकांना पिण्याचें पाणी मिळण्याची सोय होईल.

**भारताचा आधुनिक इतिहास**—रशिआंत भारताच्या आधुनिक इतिहासाचें एक पुस्तक लवकरच प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. ह्या पुस्तकांत १९१८ पासून १९५३ पर्यंतच्या कालखंडाचा इतिहास येईल. इतिहास-ग्रंथ रशिअन इतिहासकारांनीं सामुदायिक रीत्या लिहिलेला आहे. त्यांचें मार्गदर्शन दोघा तज्ज्ञ इतिहासकारांनीं केलेलें आहे.

**खणावें तेथें तेलच**—पश्चिम आशिआंतील कुवेतच्या राज्यांत खनिज तेलाचा फार मोठा सांठा आहे. ह्या राज्यांत कोणी विहीर खणल्यास व तिला पाणी लागल्यास विहिरीच्या मालकाला पैसाच पैसा मिळेल. पण कोठेंहि विहीर खणण्यास लागलें तर पाण्याऐवजीं तेलच सांपडण्याचा अधिक संभव असतो. त्यामुळें तेलापासून पाण्यासारखा पैसा मिळणें शक्य होईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## महाराष्ट्र रीजनल को-ऑपरेटिव्ह स्कूल,

**१० बी. जे. रोड, टाटा लॉज, पुणें-१.**

विद्यालयाचा पुढील शिक्षणवर्ग दि. १ ऑक्टोबर १९५८ पासून सुरू होईल. विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असिस्टंट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर, सब ऑडिटर, खरेदी-विक्री संघ, विविध कार्यकारी सहकारी सोसायटी व इतर मोठ्या सहकारी संस्थांचे सेक्रेटरी या दर्जाच्या नोकरवर्गांना शिक्षण दिलें जातें. विद्यालयाचा शिक्षणक्रम सहा महिने मुदतीचा आहे.

सहकारी सोसायटींत काम करणारे उमेदवार एस्. एस्. सी. उत्तीर्ण नसल्यास त्यांनीं सहकारी संस्थेंत कमीत कमी तीन वर्षे नोकरी केलेली असली पाहिजे आणि ते इंग्रजी १० वी, व्हर्नाक्युलर फायनल किंवा सेक्रेटरी शिक्षणवर्ग परीक्षा पास असले पाहिजेत. जागा शिल्लक असल्यास एस्. एस्. सी. पास झालेल्या विद्यार्थ्यांना खाजगी उमेदवार म्हणून प्रवेश मिळूं शकेल. तसेंच, वरीलप्रमाणें शैक्षणिक पात्रता असल्यास स्त्रियांनाहि प्रवेश मिळूं शकेल.

प्रवेश दिलेल्या सोसायट्यांना दरमहा रु. ४० प्रमाणें विद्यावेतन ( स्टायपेंड ) मिळेल व प्रात्यक्षिक शिक्षणाचे मुदतींत रु. ६० प्रवासभत्ता मिळेल. खाजगी उमेदवारांना विद्यावेतन मिळणार नाहीं.

( अ ) सहकारी संस्थांत नोकरी करणाऱ्या उमेदवारांनीं आपल्या संस्थेच्या ठरावाच्या नकलेसह प्रवेश अर्ज, आपल्या जिल्ह्याच्या जिल्हा सहकारी बोर्डामार्फत, आमचेकडे दि. ६ सप्टेंबर १९५८ पूर्वी पोहोंचतील अशा बेतानें पाठवावेत. या अर्जाची एक आगाऊ प्रत विद्यालयाकडे सोसायटीमार्फत पाठवावी. परस्पर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाहीं.

( ब ) खाजगी उमेदवारांनीं आपले अर्जाची एक प्रत परस्पर विद्यालयाकडे पाठवावी व एक प्रत त्या जिल्हा सहकारी बोर्डामार्फत पाठवावी. या उमेदवारांनीं अर्जासोबत प्रवेश फी पाठवूं नये.

विद्यालयाचे प्रवेश अर्ज व माहितीपत्रकें यांची किंमत आठ आणे ( ५० न. पैसे ) आहे. फॉर्म व माहितीपत्रकें विद्यालयाचे कचेरींत व जिल्हा सहकारी बोर्डाचे ऑफिसांत सुट्टीचे दिवसांखेरीज रोज ११-३० ते ५ व शनिवारीं सकाळीं ८-३० ते ११ या वेळांत मिळूं शकतील. अर्जाची मागणी करतेवेळीं आठ आणे रोख भरणें. आठ आण्यांची पोष्टल ऑर्डर पाठविणें किंवा मनीऑर्डर पाठविणें आवश्यक आहे. पोष्टाचीं तिकिटें पाठवूं नयेत.

पुणें, ठाणें, कुलाबा, रत्नागिरी, कोल्हापूर, सोलापूर, उत्तर सातारा व दक्षिण सातारा या जिल्ह्यांतून येणाऱ्या उमेदवारांनाच फक्त या विद्यालयांत प्रवेश मिळूं शकेल.

**मा. वि. मदाने,**
सुपरिन्टेन्डेन्ट.

---

**कापडाची आफ्रिकेला निर्यात**—कॉटन टेक्स्टाइल एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलतर्फे चार जणांचें एक प्रतिनिधि मंडळ लवकरच पूर्व आफ्रिकेच्या दौऱ्यावर जाणार आहे. पूर्व आफ्रिकेंत निर्यात होणाऱ्या कापडांत अलीकडे जी घट झाली आहे त्याच्या कारणांची चौकशी कौन्सिल करणार आहे. त्याचप्रमाणें. बेल्जिअन कांगोच्या कापडाच्या बाजारपेठेची पहाणीहि तें करणार आहे.


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★


प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चात मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

अन्नाचें रहस्य



बेडेकर मसाले, लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

श्री. वा. काळे ह्यांचीं
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तकें
१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल,
३ तुमचें स्थान कोणतें ?



किर्लोस्कर
इलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठी एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, द. साता[रा]

# अर्थ

बुधवार, ता. १३ ऑगस्ट, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बैलांच्या शक्तीनें वीज निर्माण करण्याचा प्रयोग ग्रामीण भागांत क्रांतिकारक ठरणार ?*

हिंदुस्थानांतील ग्रामीण जीवनांत क्रांति घडवून आणण्या-सारखा एक प्रयोग दिल्लीपासून १४ मैलांवर असलेल्या एका खेड्यांत करण्यांत आला आहे. खानपूर ह्या गांवीं बैलांच्या शक्तीनें वीज निर्माण करणाऱ्या जनरेटरचें प्रात्यक्षिक पंतप्रधान श्री. नेहरू ह्यांना दाखविण्यांत आलें. ह्या प्रयोगाची पार्श्वभूमि लक्षांत घेतल्याखेरीज त्याचें महत्त्व नीट कळण्यासारखें नाहीं. फोर्ड फौंडेशनतर्फे भारतामधील छोट्या उद्योगधंद्यांच्या विकासाचा अभ्यास करण्यासाठी एक आंतरराष्ट्रीय अभ्यास-मंडळ १९५४ सालीं आलें होतें. भारताच्या व्यापार व उद्योगखात्यानें मंडळाला आमंत्रण दिलेलें होतें. मंडळामध्यें श्री. स्टीव्हन्स नांवाचे गृहस्थ होते. त्यांनीं भारतामधील खेड्यांपुढें असणाऱ्या प्रश्नांची आस्थापूर्वक पहाणी केली. त्यांना असें आढळून आलें कीं, खेड्यांत पिण्याच्या व शेतीला लागणाऱ्या पाण्याचा तुटवडा असतो; वीज तर नसतेच. अर्थातच छोट्या उद्योगधंद्यांना लागणारी औद्योगिक शक्तीहि असत नाहीं. छोट्या उद्योगधंद्यांचें उत्पादन-तंत्र मागासलेलें असतें आणि रस्ते व घरें बांधण्यासाठी लागणाऱ्या विटा उपलब्ध नसतात. श्री. स्टीव्हन्स ह्यांनीं ह्या गरजा लक्षांत घेऊन स्वतःच संशोधनाला सुरवात केली. अभ्यासमंडळांतील त्यांच्या सहकाऱ्यांनींहि त्यांना हात-भार लावला.

तेलाच्या घाण्याला जुंपलेले बैल जसें चक्राकार फिरतात, तसेंच जनरेटर चालविण्यासाठी फिरत असतात. वीज निर्माण करण्यासाठी लागणारा जनरेटर अमेरिकेच्या जेनरल इलेक्ट्रिक कंपनीनें मुद्दाम बनविला आहे. ह्यांत अडचण अशी होती कीं, बैलांची गति एकसारखी राहत नसल्यामुळें अशा अनियमित गतीच्या साह्यानें नियमित दाबाची वीज कशी करावयाची ? पण हा प्रश्न कंपनीनें यशस्वीपणें सोडविलेला आहे. निर्माण होणाऱ्या विजेच्या साह्यानें लाकूडकामाचा छोटा कारखाना दिवसा चालूं शकेल आणि रात्रीच्या वेळीं १५० घरांना विजेचा प्रकाश पुरवितां येईल. बैलांच्या साह्यानें आडवा दांडा फिरूं लागल्यावर एक पंपहि पाहिजे तेव्हां चालूं करतां येतो. ह्या पंपाच्या साह्यानें दर मिनिटाला ३०० गॅलन पाणी उपसलें जातें आणि ते ३०० फूट उंचीपर्यंत खेंचलें जाऊं शकतें. विजेच्या साह्यानें लोहारकाम व सुतारकाम करण्याचा छोटासा कारखाना चालवितां येईल. त्याशिवाय घरांसाठी व रस्त्यांसाठी लागणाऱ्या विटा जलद व थोड्या खर्चांत करण्याची एक भट्टीहि अभ्या-सकांनीं बनविली आहे.

सध्यां ह्या यांत्रिक बारदानांतील सर्व यंत्रें अमेरिकेंतील धंदे-वाईक संघटनांनीं देणगी म्हणून दिलेलीं आहेत. जनरेटर आणि पंप, व त्यांना लागणारी आनुषंगिक यंत्रसामुग्री तयार करण्यास २५,००० रुपये खर्च आलेला आहे. पण हीच यंत्रसामुग्री भारतांत मोठ्या प्रमाणावर तयार करण्यांत येऊं लागली, तर ती १५,००० रुपयांपर्यंत होऊं शकेल असा अंदाज करण्यांत आला आहे. भारतामधील प्रत्येक खेड्याला पाणी उपसणाऱ्या पंपाची व विजेची गरज आहे. लोहारकामाचें व सुतारकामाचें वर्कशॉप कांहीं खेड्यांच्या गटांतून काढतां येण्यासारखें आहे. रूढ मार्गानें वीज पुरविण्याची झाली तर प्रत्येक खेड्यामागें ६०,००० रुपये खर्च करावे लागतील असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. पण बैलांच्या साह्यानें निर्माण करण्यांत येणारी वीज अधिक स्वस्त पडेल असा ह्या अमेरिकन तंत्रज्ञांचा तर्क आहे. ह्या यांत्रिक बारदानाची देशांतच निर्मिति करण्याबाबत अजून निर्णय घेण्यांत आलेला नाहीं. आर्थिक दृष्ट्या योग्य वाटलें तरच मध्यवर्ती सरकार होकारार्थी निर्णय घेईल.

---

* ह्याच विषयावर "अर्थ" मध्यें २१ मे, १९५८ रोजीं १६४ पृष्ठावर प्रसिद्ध झालेला व ४ जून, १९५८ रोजीं १७८ पृष्ठावर प्रसिद्ध झालेला मजकूर पहावा.

---

## जपानी स्त्रियांचा 'किमोनो' दुर्मिळ होणार !

परिस्थितीच्या मानानें जपानमधील तरुण स्त्रिया आपला परंपरागत 'किमोनो' हा पोषाक पेहरण्याचें बंद करूं लागल्या आहेत. युद्धोत्तर जपानमध्यें अधिकाधिक प्रमाणांत जपानी स्त्रिया अर्थार्जनासाठी घराबाहेर पडूं लागल्या. त्यांना काम कर-तांना पाश्चिमात्य पद्धतीचा पोषाखच अधिक सोयीस्कर वाटतो. सामाजिक बदलाचें हें कारण प्रमुख असलें, तरी त्याला जोराची चालना देणारी एक दुर्दैवी घटना टोकिओमध्यें घडली. सुमारें २५ वर्षांपूर्वी टोकिओमधील एका विविध उपयोगी वस्तु विक-णाऱ्या दुकानाला एकाएकीं आग लागली. ह्या दुकानांत विक्री करणारे नौकर बहुसंख्य स्त्रिया होत्या. दुकान चौथ्या मजल्यावर असल्यानें आग लागतांच हाहाःकार उडाला. आग विझविण्याचे बंब तावडतोब आले व त्यांनीं आपल्या शिड्या त्या मजल्यापर्यंत उंचावल्या. विक्रेत्या मुली शिड्यावरून खालीं उतरूं लागल्या. पण 'किमोनो' सावरतां सावरतां त्यांची त्रेधा झाली. "किमोनो"च्या आंत एखादें उपवस्त्र वापरण्याची प्रथा नस-ल्यानें त्यांच्या भीतींत अधिकच भर पडली. ह्या सर्व गडबडींत १३ मुली प्राणाला मुकल्या आणि १२५ जखमी झाल्या. दुसऱ्याच दिवशीं दुकानाच्या मालकानें सर्व विक्रेत्या मुलींनीं उपवस्त्र नेसण्याचा हुकूम काढला आणि नंतर लवकरच सर्व मुलींनीं पाश्चिमात्य पोषाख करण्यास सुरुवात केली. पुढें हळुहळु पाश्चिमात्त्य पोषाख करण्याची प्रथा वाढतच गेली. आतां जपान-मधील शाळांतून सुद्धां असा सुटसुटीत पोषाख करणाऱ्या मुली वाढतच चालल्या आहेत. मिसेस सुगीनो नांवाच्या एका बाईंनीं पाश्चात्य पोषाख कसा वापरावा तें शिकविण्यासाठी ७०० शाळाच चालविल्या आहेत.

## १९५७–५८ मधील चलन व नाणीं

**रिझर्व्ह बँकेचा "करन्सी व फायनान्स" विषयक अहवाल**

१९५३–५४ पासून भारतांत चलनवाढ होत आहे. १९५७–५८ मध्यें ५२·३ कोटी रुपयांनीं चलन वाढलें; १९५६–५७ मध्यें ५५·७ कोटी रु. चलनाची भर पडली होती. १९५३–५४ पासून १९५७–५८ पर्यंत चलनांत एकूण ४४१ कोटी रु. ची भर पडली आहे.

१९५७–५८ अखेर १,५३६ कोटी रुपयांच्या चलनी नोटा व्यवहारांत खेळत होत्या. १९५६–५७ चे मानानें त्या ३·६% जास्त होत्या. १९५६–५७ मध्यें ह्या पूर्वीच्या वर्षाच्या मानानें ४·२% वाढ झाली होती. १९५३–५४ पासून आतांपर्यंत खेळत्या चलनी नोटा ४१% नें वाढल्या आहेत.

१९५७ मध्यें झालेल्या चलनवाढींत १० रु., १०० रु. ५,००० रु. व १०,००० रु. च्या नोटांनीं वाढता भाग घेतला; ५ रु. व १,००० रु. च्या नोटा कमी झाल्या. १०० रु. च्या चलनी नोटांची लोकप्रियता गेल्या वर्षी आणखी वाढली. एकूण चलनी नोटांत त्यांचें प्रमाण १९५६ अखेर ४१·७% होतें, तें १९५७ अखेर ४२·८% झालें. १० रु. च्या नोटांचें प्रमाण ४०·९% चें ४०·४% झालें. १९५३ अखेर तें ४२·२% होतें. ५ रु. च्या नोटांचें प्रमाण सालोसाल कमी होत चाललें आहे.

नव्या, मोठ्या रकमाच्या नोटा एप्रिल, १९५४ मध्यें सुरू केल्या, त्यांचें प्रमाण ४·६% चें ४·७% झालें; त्यांपैकीं ५,००० रु. च्या नोटांचें प्रमाण ०·७% चें ०·८% झालें; १०,००० रु. च्या नोटा ०·४% वरून ०·६% वर गेल्या; पण १,००० रु. च्या नोटा ३·५% च्या ३·३% झाल्या. मोठ्या रकमाच्या नोटांचे स्वरूपांत १९५४ अखेर ३८ कोटी रु. होते; १९५७ अखेर ते ७३ कोटी रु. झाले. ह्या ७३ कोटी रुपयांपैकीं ५१ कोटी रुपये १,००० रु. च्या नोटांत, १३ कोटी रुपये ५,००० रु. च्या नोटांत आणि ९ कोटी रुपये १०,००० रु. च्या नोटांत होते.

रुपयांच्या नाण्यांचा प्रसार कमी होत चालला आहे. १९५७–५८ अखेर ११६ कोटी रुपये रुपयाच्या नाण्यांचे स्वरूपांत होते. (त्यांत रुपयाच्या नोटांचाहि समावेश होतो); १९५०–५१ अखेर ती रक्कम १३८ कोटी रुपये होती. म्हणजे, त्यांत १६% घट झाली. रिझर्व्ह बँकेजवळील रुपयांचा साठा १२९ कोटी रुपयांचा होता.

१ एप्रिल, १९५७ रोजीं दशमान नाणीं प्रथम सुरू झालीं. १९५७–५८ मध्यें २·७६ कोटी रुपयांचीं नवीं नाणीं प्रचारांत आलीं व २·११ कोटि रुपयांचीं जुनीं नाणीं प्रचारांतून काढून घेण्यांत आलीं. नव्या नाण्यांची वर्गवारी अशी — १० नये पैसे: १२० लक्ष रुपये, ५ नये पैसे : ६६ लक्ष रुपये, २ नये पैसे: ४२ लक्ष रुपये, १ नया पैसा : ४८ लक्ष रुपये. जुनीं नाणीं काढून घेतली, त्यांत सर्वांत जास्त २ आणेवाली (१४२ लक्ष रु. ची) होती.

टांकसाळींत नवीं नाणीं खालीलप्रमाणें पाडण्यांत आलीं :—

(आंकडे हजारांचे)

**१९५७–५८ मध्यें टांकसाळींत पाडलेलीं नवीं नाणीं**

| नाणें | कोणत्या टांकसाळींत | | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|
| | मुंबई | हैद्राबाद | अलिपूर | संख्या | किंमत (रु.) |
| १० नये पैसे | ६,३२,९० | | ९,१७,५० | १५,५०,४० | १,५५,०४ |
| ५ नये पैसे | ९,५८,०५ | | ११,०८,३० | २०,६६,३५ | १,०३,३२ |
| २ नये पैसे | १५,७८,६५ | | १६,३९,७५ | ३२,१८,४० | ६४,३७ |
| १ नया पैसा | ८,९९,६० | १५,१६,३० | १०,८५,८० | ३५,०१,७० | ३५,०२ |
| एकूण | ४०,६९,२० | १५,१६,३० | ४७,५१,३५ | १,०३,३६,८५ | ३,५७,७४ |

**बसेसमधील रेडिओला बंदी**—मद्रासच्या ट्रॅन्सपोर्ट कमिशनरनें उतारूंची वहातुक करणाऱ्या मोटारी व टॅक्सीजू ह्यांच्यांत रेडिओ बसविण्यास बंदी केली आहे. रेडिओच्या आवाजामुळें ड्रायव्हरचें लक्ष तिकडे जाऊन अपघात होण्याचा संभव वाढत असल्यानें ही बंदी करण्यांत आली आहे. प्रादेशिक वाहतुक खात्याला त्याप्रमाणें कळविण्यांत आलें आहे.

**नव्या उद्योगधंद्यांना सवलत**—मलायाच्या सरकारनें देशांत नव्यानें काढण्यांत येणाऱ्या उद्योगधंद्यांना तीन ते पांच वर्षेपर्यंत करमाफी देणारें बिल मंजूर केलें आहे. ह्या सवलतीमुळें परदेशीय भांडवल मलायांत येऊन तें उद्योगधंदे काढण्यास प्रवृत्त होईल, अशी सरकारची अपेक्षा आहे.

**१२५ जागा; ३,२०० अर्जे**—पंचमहाल डिस्ट्रिक्ट स्कूल-बोर्डानें प्राथमिक शिक्षकांच्या १२५ जागा भरण्यासाठी अर्जे मागविले होते. ह्या जागांसाठी बोर्डाकडे ३,२०० उमेदवारांनीं अर्जे केले आहेत. अर्जदारांपैकी ७०० अर्जदारांना मुलाखतीसाठी बोलावण्यांत आलें आहे.

**सांडपाण्याचा उपयोग**—मद्रासमधील सांडपाण्याचा उपयोग करून घेण्याची योजना आंखण्यांत आली आहे. शहरापासून तीन मैलांवर असलेल्या एका खेड्यांत ह्या पाण्याचा उपयोग गुरांना लागणारा चारा निर्माण करण्यासाठी करण्यांत येईल. योजनेसाठी मद्रास सरकारनें दोन लाख रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे.

**विमानतळासाठी लागणारी यंत्रसामुग्री**—भारतामधील विमानतळ अद्यावत् राखण्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री दिल्ली येथें तयार करण्यांत येणार आहे. आतांपर्यंत ही सामुग्री परदेशांत केली जात होती. परदेशीय चलनाच्या टंचाईमुळें स्वयंपूर्ण होण्याची निकड अधिकच वाटत आहे.

**क्षयरोग्यांसाठीं संस्था**—पश्चिम बंगालमधील मिदनापूर जिल्ह्यांत बऱ्या झालेल्या क्षयरोग्यांची राहण्याची सोय करण्यासाठी एक वसाहत स्थापन करण्यांत आली आहे. वसाहतींत बांधण्यांत यावयाच्या इमारतींचा कोनशिला समारंभ नव्हर्नर कु. पद्मजा नायडू ह्यांच्या हस्तें करण्यांत आला.

# शेड्यूल्ड बँकांकडील ठेवी

## वेगवेगळ्या बँकांजवळील वेगवेगळ्या प्रकारच्या ठेवींत १९५१–५७ ह्या मुदतींत झालेला फरक

१९५१ पासून भारताचा आर्थिक विकास होत आहे; पहिली व दुसरी पंचवार्षिक योजना ह्या त्यास मुख्यतः कारणीभूत आहेत. औद्योगिक उत्पादनांत वाढ होऊन जास्त लोकांना कामधंदा मिळाला. त्याबरोबर पैशाचा पुरवठाहि वाढला. १९५३ पर्यंत ठेवींत वाढ झाली नाहीं; १९५३ नंतर ठेवींत वाढ होत गेली. मुदती ठेवींचे एकूण ठेवींतील प्रमाण वाढलें. ठेवीदारांच्या संख्येंतहि मोठी भर पडली. खालील तक्त्यांत शेड्यूल्ड बँकांच्या ठेवींची वर्गवारी दिली आहे. १९५१ ते १९५७ ह्या मुदतींत शेड्यूल्ड बँकांजवळील ठेवींत ५२६ कोटी रुपयांची वाढ झाली; म्हणजे ठेवी ६४% नें वाढल्या. १९५३ नंतर दरसाल सुमारें ८० कोटी रुपयांनीं ठेवी वाढल्या; १९५७ मध्यें मात्र ठेवींत २७३ कोटी रुपयांची वाढ झाली. म्हणजे त्यापूर्वीच्या चार वर्षांतील वाढीइतकी वाढ ह्या एका वर्षांतच झाली.

सरकारच्या तुटीच्या अर्थव्यवस्थेचा हा अप्रत्यक्ष परिणाम आहे. १९५६ पर्यंत तो परिणाम प्रकर्षानें दिसून आला नाहीं; चलनवाढ बेताची झाली म्हणा किंवा बिनसरकारी आयातीच्या किंमतीसाठी बरीच रक्कम उपयोगली गेली म्हणा. १९५७ मध्यें चलनवाढीचें प्रमाण वाढलें आणि आयातीमध्यें कपात झाल्यामुळें पैसा प्रसारांत राहिला. भारताला अमेरिकेनें पी. एल्. ४८० करारान्वयें माल पुरविला, त्याची किंमत रुपयांत दिली ती अमेरिकन सरकारनें येथील बँकांतच ठेवली, त्यामुळेंहि ठेवींत वाढ दिसून येते. दोन बँका रिझर्व्ह बँकेच्या दुसऱ्या शेड्यूलमध्यें आल्या, त्यांच्या ठेवींचीहि भर पडली; पण ती त्यामानानें थोडी.

ठेवीदारांची संख्या सालोसाल वाढत गेली; ह्याचा अर्थ बँकिंगचा प्रसार अधिकाधिक झाला, हाच होय. सेव्हिंग्ज खात्यांतच विशेष वाढ झाली. लहान उत्पन्नाच्या लोकांनीं नवीं खातीं उघडलीं, आणि लहान गांवांतून बँकांच्या शाखा सुरू झाल्या. त्यामुळें बँकिंगच्या सोई आणखी उपलब्ध झाल्या.

( तक्ता १ पाहा )

डिमांड ठेवींचें टाइम ठेवींत होत असलेलें रूपांतर, ही एक अत्यंत महत्त्वाची घटना आहे. पहिल्या दोन वर्षी डिमांड ठेवी ३९ कोटी रुपयांनीं घटल्या, पण पुढें त्या १४९ कोटी रुपयांनीं वाढल्या. सेव्हिंग्ज व मुदती ठेवीं मात्र ह्या काळांत प्रथमपासूनच एकसारख्या वाढत गेल्या; ती वाढ अनुक्रमें ६७ कोटी व ३४९ कोटी रुपयांची झाली. टाइम ठेवींत झालेल्या वाढीपैकी ६०% वाढ एकट्या १९५७ मध्येंच घडून आली, हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. अशा ठेवींवरील चढत्या व्याजाचा दराचा फायदा घेण्यासाठी ही प्रवृत्ति दिसून आली. १९५१ मध्यें शेड्यूल्ड बँकांकडील एकूण ठेवींपैकी ५५·५% ठेवी डिमांड स्वरूपाच्या होत्या; १९५७ मध्यें हें प्रमाण ४२·०% वर उतरलें. ह्या उलट, टाइम ठेवींचें प्रमाण ह्याच मुदतींत २८·०% चें ४३·०% वर गेलें. एकट्या १९५७ मध्येंच टाइम ठेवींचें प्रमाण ८·०% नें वाढलें व करंट ठेवींचें ६·६ नें कमी झालें. सेव्हिंग्ज ठेवींचें प्रमाण १९५६ पर्यंत १६ ते १७% कायम होतें, तें १९४७ मध्यें १५% झालें.

सर्व प्रकारच्या ठेवींचा एकत्रित विचार केला, तर वैयक्तिक ठेवींत सर्वांत जास्त ( १७७ कोटी रु. ) वाढ झाली. सरकारी व बिन-सरकारी ठेवी १६३ कोटी रुपयांनीं सुधारल्या व व्यावसायिक ठेवींत ८९ कोटी रुपयांची सुधारणा झाली. एकूण

### तक्ता नं. १

### शेड्यूल्ड बँकांच्या ठेवींची वर्गवारी

( खात्यांची संख्या लाखांच्या आंकड्यांत; रक्कम कोटी रुपयांत )

| अखेर | एकूण | | डिमांड | | सेव्हिंग्ज | | टाइम | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खात्यांची संख्या | रक्कम | खात्यांची संख्या | रक्कम | खात्यांची संख्या | रक्कम | खात्यांची संख्या | रक्कम |
| १९५१ | ३२·३ | ८२१·६२ | १०·२ | ४५६·३१ (५५·५) | १९·१ | १३५·३५ (१६·५) | ३·० | २२९·९६ (२८·०) |
| १९५२ | ३३·३ | ८१४·३६ | १०·१ | ४२७·६६ (५२·५) | १९·९ | १३६·६७ (१६·८) | ३·३ | २५०·०३ (३०·७) |
| १९५३ | ३३·९ | ८२३·०७ | १०·० | ४१७·५७ (५०·७) | २०·५ | १३८·८२ (१६·९) | ३·४ | २६६·६८ (३२·४) |
| १९५४ | ३५·१ | १०९·६५ | १०·० | ४६४·६३ (५१·१) | २१·४ | १४६·४६ (१६·१) | ३·७ | २९८·८४ (३२·८) |
| १९५५ | ३७·२ | ९९३·६५ | १०·२ | ४९७·०३ (५०·०) | २२·७ | १६२·५३ (१६·४) | ४·३ | ३३४·०९ (३३·६) |
| १९५६ | ४०·२ | १०७५·६१ | १०·८ | ५२२·२१ (४८·६) | २४·६ | १८३·६५ (१७·१) | ४·८ | ३६८·९५ (३४·३) |
| १९५७ | ४३·९ | १३४७·६१ | १०·६ | ५६६·२५ (४२·०) | २७·४ | २०१·९८ (१५·०) | ५·९ | ५७९·३८ (४३·०) |
| १९५१ चे मानानें वाढ(%) | ३५·९१ | ६४·०२ | ३·९ | २४·०९ | ४३·५ | ४९·२२ | ९६·७ | १५१·९ |

सूचना : कंसांतील आंकडे ठेवींच्या एकूण रकमेशीं प्रमाण दर्शवितात.

ठेवींशीं पडणारें प्रमाण विचारांत घेतलें, तर वैयक्तिक ठेवींचें प्रमाण ४६% चें ४१% झालें व व्यावसायिक ठेवींचें प्रमाण ३०. चें २९% झालें. सरकारी व बिनसरकारी ठेवी ८% च्या १७% झाल्या.

वेगवेगळ्या बँकांतील ठेवींचा स्वतंत्र विचार केला, तर प्रमुख हिंदी शेडयूल्ड बँका* व इतर हिंदी शेडयूल्ड बँका ह्यांच्यांतील ठेवी एकूण ठेवींच्या मानानें अनुक्रमें ६३% वरून ६५% आणि १७% वरून २०% गेल्या. विदेशी शेडयूल्ड बँकांतील ठेवींचें प्रमाण २०% चें १५% वर उतरलें

तक्ता नं. २

ठेवींची बँकवार वर्गवारी

( आंकडे कोटी रुपयांचे )

| अखेर | ९ प्रमुख हिंदी शेडयूल्ड बँका | विदेशी शेडयूल्ड बँका | इतर हिंदी शेडयूल्ड बँका | एकूण |
|---|---|---|---|---|
| १९५१ | ५१६·६६ (६२·९) | १६५·६५ (२०·२) | १३९·३१ (१७·०) | ८२१·६२ |
| १९५२ | ५०९·३४ (६२·५) | १६८·७० (२०·७) | १३६·३० (१६·७) | ८१४·३६ |
| १९५३ | ५१६·३८ (६२·७) | १६१·४४ (१९·६) | १४५·२५ (१७·६) | ८२३·०७ |
| १९५४ | ५७६·२४ (६३·३) | १७४·२७ (१९·२) | १५९·४३ (१७·५) | ९०९·९४ |
| १९५५ | ६१९·४४ (६२·३) | १८८·९७ (१९·०) | १८५·२५ (१८·६) | ९९३·६६ |
| १९५६ | ६७८·६१ (६३·१) | १८५·०५ (१७·२) | २११·१५ (१९·७) | १०७४·६६ |
| १९५७ | ८७६·१९ (६५·०) | २०५·३८ (१५·२) | २६६·०४ (१९·८) | १३४७·६१ |

सूचना : कंसांतील आंकडे एकूण ठेवींशीं प्रमाण दर्शवितात.

विदेशी एक्सचेंज बँकांतील ठेवींपैकी बहुतेक ठेवी डिमांड स्वरूपाच्या आहेत; परंतु त्यांचें प्रमाण कमी होत गेलें आहे. १९५१ मध्यें त्यांचें प्रमाण ७२% होतें, तें १९५७ मध्यें ५८% झालें. परंतु, त्या बँकांतील टाइम व सेव्हिंग्ज ठेवी अनुकमें २२% व ६% च्या ३४% व ८% झाल्या. कॉल व शॉर्टटर्म ठेवींवरील वाढवलेले व्याजाचे दर व सेव्हिंग्जचीं नवीं खातीं, ह्यांचा तो परिणाम आहे. त्यांच्या एकूण ठेवींत ४० कोटि रुपयांची वाढ झाली असली, तरी हिंदी शेडयूल्ड बँकांतील ठेवी त्यामानानें पुष्कळच वाढल्या.

प्रमुख हिंदी शेडयूल्ड बँकांकडील ठेवीमधील टाइम ठेवींचें प्रमाण २८% वरून ४४% वर चढलें, डिमांड व सेव्हिंग्ज ठेवींचें प्रमाण अनुक्रमें ५२% व २०% चें ४१% व १५% झालें.

एकूण ठेवींत ६४% वाढ झाली, तरी ठेवीदारांच्या संख्येंत फक्त ३६% च वाढ झाली. एकूण ठेवीदारांपैकी सेव्हिंग्ज बँक खातेदारांची संख्या तीन–पंचमांशापेक्षा अधिक होती. डिमांड खात्याचे ठेवीदार २४% व टाइम खात्यांचे ठेवीदार १३% होते. ठेवीदारांच्या वाढलेल्या संख्येपैकी ( ११·५३ लक्ष नवे खातेदार ) सेव्हिंग्ज खात्याचे नवे ठेवीदार ८·२६ लक्ष व टाइम खात्याचे नवे ठेवीदार २·८२ लक्ष होते. डिमांड खात्यांचे ठेवीदार १९५१ मधील संख्येच्या आसपास ( १० लक्ष ) एवढेच राहिले.

प्रत्येक खात्यांतील रकमेंत वाढ झाली. डिमांड ठेवींची सरासरी रकम १९५१ मध्यें ४,४८६ रु. होती ती १९५३ मध्यें ४,१९२ झाली. पण १९५७ मध्यें ती वाढून ५,३३२ झाली. सेव्हिंग्ज ठेवीची सरासरी रकम १९५१ मध्यें ७०८ रु. होती, ती १९५७ मध्यें ७३७ रु. झाली. टाइम ठेवीची सरासरी रकम १९५१ मध्यें ७,५४० रु. होती, ती १९५७ मध्यें ९,८८७ रु. झाली.

प्रमुख हिंदी शेडयूल्ड बँकांकडे १९५७ मध्यें ठेवींच्या खात्यांपैकी २५·२ लक्ष म्हणजे ५७·८% खातीं होतीं; १९५१ मधील तत्सम आंकडे २०·५ लक्ष खातीं व ६३·३% खातीं असे होतें. विदेशी बँकांतहि ठेवींच्या खात्यांचें प्रमाण ५·९% चें ५·२% झालें. इतर हिंदी शेडयूल्ड बँकांकडील खातीं मात्र ३०·७% वरून ३७·२% वर गेलीं. ह्याचा अर्थ, पगारदार लोकांचा व लहान शहरांतील लोकांचा यास्त पैसा बँकांकडे आला. लहान शेडयूल्ड बँकांकडील ठेवींचीं खातीं ६·३७ लक्षांनीं वाढली; पण त्यांपैकी सुमारें ३ लक्ष खात्यांत प्रत्येकी ५०० रु. पेक्षा कमी रकम शिल्लक होती

## पोलादाच्या किंमती उतरण्याचा संभव नाहीं

इंडिअन आयर्न अँड स्टील कंपनीचे गव्हर्निंग डायरेक्टर श्री. वीरेन् मुकर्जी ह्यांनीं वृत्तपत्राच्या प्रतिनिधींना मुलाखत देतांना असें सांगितलें कीं, भारतांतील सार्वजनिक मालकीच्या विभागांतील पोलादाचे कारखाने चालू झाल्यावर सुद्धां हिंदी पोलादाची किंमत आयात केलेल्या परदेशी पोलादाच्या किंमतीपेक्षां कमी असण्याचा संभव नाहीं. कंपनीच्या विस्ताराची जी योजना दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत हातीं घेण्यांत येत आहे ती मधील कांहीं पुऱ्या झालेल्या भागाचें उद्घाटन करण्याच्या प्रसंगीं त्यांनीं वरील माहिती दिली. ते म्हणाले कीं, हिंदी पोलादाची किंमत चढी असण्याचीं कारणें अशीं सांगतां येतील: इतर देशांतील पोलादाच्या कारखान्यांत जितकीं माणसें कामावर असतात त्या मानानें भारताच्या पोलादाच्या कारखान्यांत अधिक माणसें असतात. शिवाय, भारताच्या कारखान्यांतील पोलादाच्या उत्पादनाची किंमत अधिक असते आणि पोलादाच्या वाहतुकीबाबत अडचणी असतात. अतिपूर्वेकडील पोलादाच्या बाजारांत जपान आपलें बस्तान चांगलें बसवील असें दिसतें. जपानला अधिकांश लोखंड असलेली उत्तम प्रतीची माती भारताकडून स्वस्त दरानें मिळत आहे. त्यामुळें किंमतींत स्वस्त असें पोलाद निर्माण करणें जपानला शक्य होत आहे. म्हणजे लोखंडाची माती स्वस्त देऊन भारत चढ्या किंमतीनें पोलाद विकत घेत आहे. गेल्या कांहीं दिवसांत भारतांत तयार झालेल्या पोलादाच्या किंमती एकदम वाढल्या आहेत. आज अशी स्थिति आहे कीं, आयात केलेल्या परदेशी पोलादाची किंमत भारतांतील पोलादाच्या किंमतीपेक्षा दर टनामागें अवघी १४ रुपयांनीं अधिक आहे.

## पत्त्यांतील नवल

न्यूझीलंडमध्यें डॅनरव्हाइक गांवीं चार स्त्रिया ब्रिज खेळत असतांना, पत्ते वाटले त्यावेळीं प्रत्येकीला एकेका रंगाचीं तेरा पानें आलीं. अशा चार रंगाचीं पानें चौघांना वाटलीं जाण्याचा संभव १,५८,७५,३३,८९,८९९ डावांत एकदा असतो, असें गणित आहे.

* अलाहाबाद बँक, बँक ऑफ बरोडा, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, इंडियन बँक, पंजाब नॅशनल बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया ( १९५५ पर्यंत इंपीरिअल बँक ), युनायटेड बँक ऑफ इंडिया व युनायटेड कमर्शिअल बँक )

### प्रसारांतील चलनी नोटा ( लक्ष रुपयांचे आंकडे )

| | प्रसार | | | वाढ (+) अथवा घट (–) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | नोटा | रुपये | नोटा व रुपये | नोटा | रुपये | नाणीं | एकूण |
| १९५२–५३ | १,०८९,९५ | ११९,७१ | १,२०९,६६ | — ७,९९ | —५,७४ | —४,०९ | —१७,८२ |
| १९५३–५४ | १,१४२,७५ | ११७,९२ | १,२६०,६७ | + ५२,८१ | —१,७९ | —३,१७ | + ४७,८५ |
| १९५४–५५ | १,२३३,९२ | ११२,९८ | १,३४६,९० | + ९१,१७ | —४,९४ | —१,१४ | + ८५,०९ |
| १९५५–५६ | १,४२३,४७ | १२२,१३ | १,५४५,६० | +१८९,५५ | +९,१५ | + १,४७ | +२००,१७ |
| १९५६–५७ | १,४८२,९२ | ११७,८८ | १,६००,८० | + ५९,४५ | —४,२५ | + ४५ | + ५५,६५ |
| १९५७–५८ | १,५३५,९६ | ११६,४५ | १,६५२,४१ | + ५३,०४ | —१,४३ | + ६५ | + ५२,२६ |

### प्रसारांतील चलनी नोटांतील वेगवेगळ्या नोटा ( आंकडे लक्ष रुपयांचे )

| डिसेंबर असेर | २ रु. | (१) चें (१५) शीं प्रमाण | २ रु. | (३) चें (१५) शीं प्रमाण | १० रु. | (५) चें (१५) शीं प्रमाण | १०० रु. | (७) चें (१५) शीं प्रमाण | १,००० रु. | (९) चें (१५) शीं प्रमाण | ५,००० रु. | (११) चें (१५) शीं प्रमाण | १०,००० रु. | (१३) चें (१५) शीं प्रमाण | एकूण (१+३+५+७+९+११+१३) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १९५२ | २३,४३ | २·१ | १४१,२० | १२·७ | ४६१,६४ | ४१·४ | ४८७,४९ | ४३·८ | | | | | | | १,११३,७६ |
| १९५३ | २४,८५ | २·२ | १४४,७२ | १२·६ | ४८४,४१ | ४२·२ | ४९४,२१ | ४३·० | | | | | | | १,१४८,१९ |
| १९५४ | २६,५२ | २·२ | १५०,५७ | १२·३ | ५११,५० | ४१·६ | ५०२,०२ | ४०·९ | ३२,०६ | २·६ | ५,०४ | ०·४ | १,०१ | ०·१ | १,२२८,७२ |
| १९५५ | २८,६६ | २·१ | १५९,३६ | ११·६ | ५६२,८९ | ४१·० | ५५०,०५ | ४०·१ | ५६,३७ | ४·१ | ९,८५ | ०·७ | ५,८१ | ०·४ | १,३७२,९९ |
| १९५६ | २८,७२ | १·९ | १६१,२३ | १०·९ | ६०४,६६ | ४०·९ | ६१६,५८ | ४१·७ | ५२,२४ | ३·५ | ९,९२ | ०·७ | ५,७३ | ०·४ | १,४७३,०८ |
| १९५७ | २८,३० | १·९ | १५५,६६ | १०·२ | ६१५,९० | ४०·४ | ६५१,८१ | ४२·८ | ५१,०६ | ३·३ | १२,९१ | ०·८ | ८,५८ | ०·६ | १,५१४,२२ |


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : २४८३.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यावरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षें | : | २¾ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | ३½ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवीचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१–७–५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक



## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई–१.
( स्थापना : १९११ )

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :
भागीदारांतर्फे रु. ४१,०८,०००
मुंबई सरकारतर्फे रु. ६६,००,०००
रु. १,०८,०८,०००

गंगाजळी व इतर फंड : रु. ६०,७६,०००
एकूण ठेवी : रु. ११,००,२६,०००
खेळतें भांडवल : रु. २०,५०,००,०००

### ११ जिल्ह्यांमध्यें ६० शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेकशनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.

## हिंदु दत्तकाचा व पोटगीचा कायदा

"ह्या कायद्याला ता. २१ डिसेंबर १९५६ रोजीं मंजुरी मिळाली. तेव्हांपासून हा कायदा अंमलांत आला. ता. ३० जानेवारी १९४४ रोजीं ठराव करून हिंदु संहिता (Hindu Code) तयार करण्याबद्दल हिंदुस्थान सरकारनें राव समितीची नेमणूक केली. राव समितीनें पराकाष्ठेचे प्रयत्न करून दिनांक २१ फेब्रुवारी १९४७ रोजीं हिंदु कायद्याच्या मसुद्यासह आपलें इतिवृत्त प्रसिद्ध केलें. हा मसुदा मध्यवर्ति विधिमंडळानें निवडक समितीकडे पाठविल्यानंतर आंबेडकर समितीनें त्यावर सफाईचा हात फिरविला व कांहीं फेरबदल करून हिंदु कायद्याचा नवीन मसुदा आपल्या इतिवृत्तासह घटनापरिषदेपुढें सादर केला. नवीन हिंदु कायद्यामध्यें ज्या क्रांतिकारक बाबी आहेत आणि ज्या बाबी रामायणांतल्या रामाप्रमाणें आहेत असें कायदे-पंडितांना वाटते त्या बाबी अशा :—

(१) मिताक्षराऐवजीं दायभाग, (२) मुलीला हिस्सा, (३) मिळकतीवरील स्त्रियांची अमर्यादित मालकी, (४) एकपत्नीकत्व व (५) घटस्फोट.

हिंदु कोडबद्दल जिकडे तिकडे वादळ झालें व हिंदु कोड पास करून घेणें सरकारला जड जाऊं लागलें. या कठीण परिस्थितींत सरकारनें एक नामी युक्ति काढली. ती युक्ति अशी कीं हिंदु कोडाचे भाग पाडून त्या भागांचे निरनिराळे कायदे पास करून घेणेंच. ही युक्ति कल्पनेबाहेर यशस्वी झाली. प्रस्तुतचा कायदा अशाच तऱ्हेनें पास झाला आहे.

ह्या कायद्यामध्यें खालील बाबी महत्त्वाच्या आहेत.

(१) मुलीला दत्तक घेतां येते.

(२) नवऱ्याला आपल्या बायकोच्या संमतिशिवाय दत्तक घेतां येणार नाहीं.

(३) अविवाहित मुलीला, घटस्फोट घेतलेल्या बाईला अगर विधवेला दत्तक घेतां येईल.

(४) कांहीं अपवाद सोडून बापाला आईच्या संमतिशिवाय मुलाला दत्तक देतां येणार नाहीं.

(५) कोर्टाच्या परवानगीनें ज्याला आईबाप नाहींत अशा मुलाला दत्तक देतां येईल.

(६) विरुद्ध रूढि नसेल तर दत्तक मुलगा पंधरा वर्षांच्या आंत असला पाहिजे व त्याचें लग्न झालें असतां कामा नये.

(७) दत्तहोमाची आवश्यकता नाहीं.

(८) दत्तक मुलाच्या बाबतींत जातीचें बंधन नाहीं; फक्त तो हिंदु असला पाहिजे.

(९) पूर्वी विधवेला आपल्या मयत नवऱ्यासाठी म्हणून दत्तक घ्यावा लागे. पण त्या कल्पनेला आतां खो देण्यांत आला असून विधवेला स्वतःसाठी दत्तक घेतां येतो.

(१०) एखाद्या माणसाला दत्तकापूर्वी इस्टेट मिळाली असेल तर दत्तकामुळें त्या माणसाची इस्टेट जाणार नाहीं.

(११) आपली इस्टेट तबदील करण्याचा जो अधिकार दत्तक बापाला अथवा दत्तक आईला आहे. त्या अधिकारावर दत्तकामुळें बाध येणार नाहीं.

(१२) जेव्हां दत्तकपत्र नोंद असेल तेव्हां दत्तविधान कायदे-शीर आहे असें कोर्टाला मानावें लागेल.

(१३) अवरुद्ध स्त्रीचा पोटगीचा अधिकार मान्य करण्यांत आला नाहीं.

(१४) अनौरस मुलीला पोटगीचा अधिकार दिला आहे.

(१५) आश्रित लोकांची यादी पोटगीच्या बाबतींत वाढ-विण्यांत आली आहे.

(१६) कांहीं कांहीं बाबतींत पोटगी देण्यांत स्त्री देखील जबाबदार धरली आहे."

श्री. राम केशव रानडे, एलएल. एम्., डिस्ट्रिक्ट जज्ज, ह्यांनीं वेगवेगळ्या कायद्यांवर आजपर्यंत सुमारें तीस लहान-मोठीं पुस्तकें लिहिलीं आहेत, त्यांत "हिंदु दत्तकाचा व पोटगीचा कायदा" ह्या पुस्तकाची भर पडली आहे. ह्या पुस्तकांतील पहिल्या प्रकरणांत कायद्याची व्याप्ति, हा कायदा कोणास लागू आहे, व्याख्या, इत्यादि कलमें असून दुसरें प्रकरण दत्तविधाना-संबंधीं आहे; तिसऱ्या प्रकरणांत पोटगीची चर्चा असून प्रकरण चौथें 'रद्द व सोडवणूक' संबंधीं आहे. मूळ कायद्याचीं कलमें देऊन त्यावर लेखकानें टीपा दिल्या आहेत, त्यामुळें सामान्य वाचकालाहि कायद्याचें आकलन सुलभतेनें होऊं शकतें.

लेखक : राम केशव रानडे, एलएल. एम्.
प्रकाशक : सेंट्रल लॉ हाउस, नागपूर २.
पृ. सं. ४६. किं. रु. १·२५. पो. ख. रु. ०·८७.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक

—भांडवल—

वसूल भांडवल (भागापोटीं आगाऊ जमा झालेल्या रकमा धरून) रु. २६,००,०००चे वर
गंगाजळी व इतर निधि रु. ११,००,०००
एकूण खेळतें भांडवल रु. दहा कोटींचे वर

★ अल्प मुदतीसाठी आकर्षक व्याजाचे दरानें ठेवी स्वीकारण्यांत येतात.

★ बँकेच्या सर्व शाखांवर व इतर महत्त्वाचे शहरांवर ड्राफ्टस दिले जातात.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

★ मराठवाड्यामध्यें खालील ठिकाणीं आमच्या शाखा आहेत.

औरंगाबाद, जालना, नांदेड, लातूर, हिंगोली, मोमिनाबाद व परळी वैजनाथ.

मुख्य कचेरी, पुणें २ — चिं. वि. जोग, मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.